# "Sunlight Is The Best Disinfectant"

सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्ट, पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्रमांक ई-१६३४ (मुंबई) यांनी ट्रस्ट च्या मालकीच्या पुणे येथील स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणाची पूर्व परवानगी मिळणे करीता धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई येथे सादर केलेल्या अर्जाबाबत रेकॉर्डप्रमाणे तपशील -

1) अर्जाचा क्रमांक – अर्ज क्रमांक २४/२०२५

2) अर्ज कोणत्या कलमाखाली दाखल केला – महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट चे कलम ३६ खाली

3) महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्टचे कलम ३६ मधील तरतूद काय आहे – एखाद्या पब्लिक ट्रस्ट द्वारे त्यांच्या मालकीच्या स्थावर मिळकतीचे विक्री, बक्षिस, अदलाबदल इत्यादी प्रकारे केलेले हस्तांतरण न्यास विलेख (ट्रस्ट डीड) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही धर्मादाय आयुक्त यांचे पूर्व परवानगी शिवाय वैध ठरणार नाही, आणि प्रस्तावित हस्तांतरण हे सदर पब्लिक ट्रस्ट चे हिताचे असल्यास अशी परवानगी देता येते; याप्रमाणे, परवानगी देतांना पब्लिक ट्रस्टचे हितार्थ काही अटी लादता येतात.

4) सदर कलम ३६ खाली दाखल अर्जावरुन सुरू झालेल्या कार्यवाही स्वरुप – महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट चे कलम ७४ नुसार "न्यायिक कार्यवाही" (Judicial Proceeding)

5) सदर कलम 36 खाली पब्लिक ट्रस्टने दाखल केलेला अर्ज निकाली काढण्याची मुदत – मा.विधिमंडळाने सन २०२४ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये केलेल्या दुरूस्तीनुसार असा अर्ज दाखल झाल्यापासून १८०

दिवसांचे आत निकाली काढणे बंधनकारक आहे. याबाबतीत कसूर केल्यास धर्मादाय आयुक्तांनी लेखी कारणे/स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

6) माजी मुख्य सचिव श्री. रत्नाकरजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर कलम ३६ मध्ये सुचविलेली सुधारणा -

पब्लिक ट्रस्ट कडून स्थावर मिळकत हस्तांतरणाची पूर्व परवानगी मागणारा कलम ३६ खाली अर्ज प्राप्त झाल्यानंतर धर्मादाय आयुक्त/सह आयुक्त यांनी तो अर्ज प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत निकाली काढावा, अन्यथा, या अर्जास मंजूरी मिळाली आहे असे निर्णायकपणे गृहित धरण्यात येईल.

7) अर्जामध्ये नमूद स्थावर मिळकतीची मालकी सदर ट्रस्टकडे कशाप्रकारे आली ?

सह दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली पुणे यांचे कार्यालयात अनुक्रमांक ८७१वर दिनांक २९.०७.१९५८ रोजी नोंदविलेल्या रजिस्टर्ड खरेदीखतान्वये सदर ट्रस्टने ही मिळकत श्री.मोतीचंद गौतमचंद शहा, राहणार मुंबई यांचेकडून रु.४७,७८०/- चे मोबदल्यात खरेदी केली.

8) प्रस्तावित हस्तांतरणास कधी हरकत प्राप्त झाली होती काय –

नाही.

9) ट्रस्टने अर्जासोबत दाखल केलेल्या शासन नोंदणीकृत मुल्यांकर्ता यांचे दिनांक १६.११.२०२४ रोजीच्या मूल्यांकन अहवालानुसार ट्रस्टची जमीन व त्यावरील बांधकाम

यांचे रेडीरेकनर नुसार व बाजार मुल्यानुसार दर किती ? - सन २०२४-२०२५ चे शासकीय रेडिरेकनर नुसार मॉडेल कॉलनी (भांबुर्डा) येथील जमिनीचे दर ६४, २७० प्रति चौरस मीटर.

जमीन व बांधकाम यांची बाजार मुल्याप्रमाणे किंमत रु.२२३,९९,००,०००/-

10) मुल्यांकन अहवालानुसार असलेले मूल्य/किंमतीचे मोबदल्यात विकासकाने ट्रस्टला किती रक्कम व बांधकाम आणि जमिन देण्याचे आदेशित केले ? – विकासकाने ट्रस्टला पैशांचे स्वरुपात रु.२३०,००,००,०००/- इतकी रक्कम द्यावी तसेच, १०,००० चौरस फूट जमीनीवर अंदाजे ५२,००० चौरस फूट बिल्टअप एरिआचे सुसज्ज होस्टेल बांधून द्यावे.

11)उपरोक्त नमूद अर्ज दाखल दिनांक ते निकाल दिनांकापर्यंत चे टप्पे व तारखा – अर्ज दाखल दिनांक – १३.०२.२०२५

स्टेजेस/टप्पे :-

अ) अर्जासोबत सादर कागदपत्रांच्या छायांकित प्रतींची मूळ प्रतिंवरुन पडताळणी – दिनांक ०५.०३.२०२५ रोजी केली.

ब) अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि.१७.०३.२०२५ रोजी सादर केले.

ड) ट्रस्ट चे वकीलांमार्फत लेखी युक्तीवाद दिनांक २६.०३.२०२५ रोजी सादर केला.

इ) निकाल दिनांक ०४.०४.२०२५ रोजी पारित केला.

ई) निकाल/आदेश धर्मादाय आयुक्तांचे संकेतस्थळावर डिजीटल स्वाक्षरीने दिनांक ०४.०४.२०२५ रोजी अपलोड केले.
(टिप- परिपत्रक क्र.६०९ दिनांक २८.०६.२०२४ नुसार, निकाल पारित केल्यानंतर सर्व अधिका-यांनी लगेच निकाल संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.)

12) सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्टने सदर कलम 36 खाली दाखल केलेला अर्ज किती कालावधीत निकाली काढला ? – ५१ दिवस

13) मंजूरी देतांना लादलेल्या अटी – ट्रस्टला मिळालेली संपूर्ण मोबदला रक्कम रु.२३०,००,००,०००/- ही राष्ट्रीयकृत/अधिसूचित बँकांमध्ये मूदत ठेवींमध्ये गुंतवावी. गुंतविलेली ही रक्कम धर्मादाय आयुक्त यांचे पूर्व परवानगीशिवाय काढता येणार नाही. संपूर्ण मोबदला रक्कम मिळाल्याशिवाय खरेदीखत नोंदवू नये.

(टिप- प्रस्तुत माहिती www.charitycommissioner.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी संबंधित Agency ला देण्यात आली आहे. काही तांत्रिक अडचण न आल्यास आज दुपारी 3 वाजेपर्यंत ती संकेतस्थळावर उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.)

आदेशावरून,

(स्वाक्षरी) २४।।०४।२०२५

सीमा केणी
अधिक्षक (न्याय)
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई